गुजरातमधील हिंसाचार आणि सत्यक्रियेचे दिव्य

वसंत पळशीकर

गोध्रा स्टेशनात साबरमती एक्स्प्रेस पोचल्यावर काय घडले त्याच्या तपशीलवार हकीकती प्रसिद्ध झाल्या आहेत. गाडीचे एक-दोन डबे पेटवून देण्याइतका मुस्लिम जमाव पागल का झाला त्याची काही कल्पना हकीकतींवरून येते.

घटनांची मालिका कोठून विचारात घ्यायला सुरुवात करावयाची हा नेहमीच नाजुक, विवाद्य व स्फोटक मुद्दा असतो. पुष्कळदा, कोणाला दोषी/अपराधी ठरवावयाचे हे आधीच ठरलेले असते; कारण तो व्यापक दीर्घकालीन भूमिकेचा भाग असतो. मग त्या निष्कर्षाप्रत आपण बुद्धिवादी तर्क व युक्तिवाद यांद्वारा पोचलो आहोत हे दाखविता येईल अशा बिंदूपासून घटनांच्या मालिकेची सुरुवात केली जाते.

घटनांची मालिका कोठून सुरू करावयाची व कोठे संपवावयाची यासाठी जर काहीशा अक्कलहुशारीने कंस घालून घेतलें तर त्या आरेखित चौकटीत दोष/अपराध निर्विवादपणे एका बाजूच्या पदरात घालता येतो. याचे अगदी आपणा अनेकांना संतप्त करणारे ताजे उदाहरण, गुजरातचे मुख्यमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांच्या कुप्रसिद्ध पाषाणहृदयी निवाड्याचे सांगता येईल. श्री. मोदींचा धिक्कार करणाऱ्या पक्षाचेच आम्ही आहोत. त्याच वेळी, ते जे काही म्हणाले ते क्रूर व अमानुष वाटत असले, आणि एका अंगाने ते तसे आहे असे मान्य केले, तरी ते ठणकावून सांगितले जायलाच हवे होते असे चाटणारे अगणित हिंदू गुजरातेत व देशभर आहेत ही गोष्टही विसरता येत नाही.

काय घडले? घटनांचा क्रम काय राहिला? ज्याची मोजदाद करता येईल असे नुकसान किती झाले, कोणाचे झाले? या स्वरूपाचे माहितीचे, संख्यात्मक मोजमापाचे, तथ्ये/घटिते यांच्या नोंदणीचे काम होऊ शकते. वस्तुनिष्ठ स्वरूपात होऊ शकते. पण जे आपण वस्तुनिष्ठ चित्रण, निवेदन, विश्लेषण व विवेचन मानतो तेही हितसंबंधांमुळे, पूर्वग्रहांमुळे, उघड व प्रच्छन्न उद्दिष्टांमुळे, व्यक्तिगत पसंती-नापसंती, लहर अशा अनेकानेक कारणांमुळे कसे आत्मनिष्ठ, पक्षपाती व विपर्यास/सत्यापलाप करणारे असते; जे दिसावयास निरागस, साधेसरळ वाटते तेही कसे छद्मी असते हे उघड करून दाखविण्यावर भर देणारा, 'जे दिसते त्याच्या पोटात काय दडलेले असते' ते स्पष्ट करू पाहणारा एक पूर्ण विचारव्यूहच आज प्रतिष्ठित व वजनदार बनलेला आहे. 'कन्स्ट्रक्शन-डिकन्स्ट्रक्शन' ही या विचारव्यूहाची चिकित्सक दृष्टी व चौकट आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. कोणाचेही कोणतेही म्हणणे असेल, लेखन असेल, वक्तव्य असेल तर त्याची चिरफाड करता येत असल्याने, ही रीत अवलंबण्याचा, तिला प्रामाण्य बहाल करण्याचा दूरगामी परिणाम बौद्धिक जीवनावरच केवळ झाला आहे असे नाही; तर सामाजिक व वैयक्तिक जीवनावरही झालेला आज आपल्याला अनुभवाला येतो.

दोन व्यक्तींमधील, समुदायांमधील वा जमाती/समाज यांच्यामधील बोलणे-वागणे-कृती, प्रत्येकच व्यवहार हा सत्ता संपादण्या-गाजविण्याच्या चौकटीत होत असतो (जीत होईल वा पराभव होईल हे वेगळे), असे वरील विचारव्यूहाचे पायाभूत व अविचल असे गृहीतक (axiom) आहे. सर्वांसाठी, स्थलकालातीत असे सत्य वा शिव वा सुंदर असे काही नसतेच; असते केवळ आपला स्वार्थी हितसंबंध साधण्यासाठी सोयीस्कर अशी मांडणी, दावा वगैरे. सत्य वगैरे काही नसते; सगळा सत्ता व स्वार्थ यांसाठीचा संघर्ष/खेळ चाललेला असतो, व्यवहारावर चढविलेले सोयीस्कर साज व मुखवटे दूर केले की वास्तव उघड होते, जे न-नैतिक असते, अशी भूमिका आपल्याला तर्काच्या वाटेने एका कडेलोटाच्या टोकाशी घेऊन जाते.

दंगल मालेगावची असो वा गुजरातमधील, वा १९९२-९३ सालची मुंबईतील, आपल्याला फाळणीच्या वेळच्या भीषण, अमानुष हत्याकांडाची, जाळपोळ, लुटालूट, बलात्कार, क्रौर्य, स्वार्थांधता यांची आठवण येऊ लागली आहे. सत्तास्पर्धा, स्वार्थी हितसंबंध, भांडणतंटे या सगळ्यांना पोटात घेऊन भारतात एक समाज म्हणून आपले सर्वांचे प्रदीर्घकाळ अस्तित्व होते. आसेतु-हिमाचल, हिंदू व मुसलमान (आणि येथील

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

एतद्देशीय अन्य धर्मीयही) दोघांनाही आपण एका देशाचे व समाज-संस्कृतीचे आहोत हा अनुभव होता. पण गेल्या शतकात आपण एक वाट धरली ज्या वाटेने चालता चालता या देशातल्या हिंदू-मुसलमान समाजांमध्ये दरी उत्पन्न झाली, आणि ती उत्तरोत्तर रुंदावत गेली. अनुल्लंघनीय झाली.

आपल्या सवयीप्रमाणे आपण बहुतेकजण यासाठी ब्रिटिश राज्यकर्ते, मुस्लिम लीगचे नेते व त्यांचे राजकारण, आणि सर्वाधिक अधिक जीना यांना दोषी धरतो. असे करीत असताना आपले ध्यान गांधी-नेहरूंच्या नेतृत्वावर, त्यांच्या विचारांवर व भूमिकांवर केंद्रित होते. पण अलीकडे पुष्कळ अभ्यास झाले आहेत. त्यांवरून आपल्या ध्यानात इतके तर नक्कीच येते की, ज्यांना हिंदू असे म्हणू त्याच्याही पदरात दोष जातो.

मुद्याची गोष्ट अशी की, या दोन समाजांमधला परस्पर-संवाद संपुष्टात आला, आणि सामाईक व सार्विक असे याबाबतीत सत्य असे काही नाही, सत्तेचा खेळच (ब्रिटिशांच्या हाती तराजू होता) सारा आहे अशी भूमिका रुजली तेव्हा एका समाजाचे व एकराष्ट्रीयत्वाचे अधिष्ठान उखडले गेले. समाजाचे या प्रकारे विघटन होते तेव्हा पिढ्यानुपिढ्या एकत्र राहिलेल्या लोकांमध्ये परस्परांविषयी षड्विकारांचा एकदम स्फोट झाल्यासारखे होते. गेल्या पन्नास वर्षांमध्ये जगभर याची ठळक भयावह उदाहरणे सापडतील. पण आपल्याला आपल्या देशाबाहेर जायची जरूर नाही. मोठ्या भूकंपानंतर पुष्कळदा त्या भागात अनेक दिवस लहान-मोठे धक्के बसत राहतात. सगळे मिळून वस्तुतः एकच घडामोड असते. फाळणीच्या त्या दीड-दोन वर्षांमध्ये विकारांचे थैमान आपण देशाच्या एका भागात अनुभवले. पण मने तर देशभर विकारग्रस्त झालेलीच होती.

महात्मा गांधींच्या हौतात्म्यामुळे आपणांस चाळीसएक वर्षे मिळाली. रोग शरीरात व मनात दाबला गेला. पण संवाद तुटलेलाच राहिला आणि समाजाचे अधिष्ठान उखडलेलेच राहिले. एका बऱ्यापैकी उदार व समंजस अशा राज्यघटनेच्या आधारे औपचारिक पातळीवर आपण एक राष्ट्र-राज्य प्रस्थापित केले. आपण तेव्हापासून या भ्रमात आहोत की राज्यघटना समाजाला अधिष्ठान पुरवते. राज्यघटना वास्तविक आपल्या संदर्भात कारभारविषयक नियम व रीती सांगणारी हस्तपुस्तिका असल्यासारखी आहे. ती समाजाचे अधिष्ठान म्हणून लोकांनी स्वत:साठी घडविली व प्रस्थापित केली अशी वस्तुस्थिती नाही. घटनापरिषदेतल्या चर्चा दांभिक वा खोट्या नव्हत्या. पण फाळणीच्या वेळी जे आपल्या समाजाचे वर्तन घडले ते जणूकाही विसरून, त्याची उपेक्षा करून आपल्या विद्वान पंडितांनी एक 'आदर्श' पुस्तकी घटना तयार केली. ती स्वीकृत केल्यानंतरही ती लोकांनी खऱ्या अर्थाने स्वीकृत करण्याची प्रक्रिया कोणी ध्यान देऊन घडविलीच नाही. ती स्वीकृत झाली आणि आपले घोडे गंगेत न्हाले!

राष्ट्रसभेच्या नेतृत्वाखालील स्वातंत्र्यलढ्याची पुण्याई व गांधींचे बलिदान यांच्यामुळे समाजमनात व शरीरात शिरलेला रोग आटोक्यात राहिला. भुसभुशीत झालेला पाया मजबूत करण्याची गोष्ट न होता, आपल्या सर्वांचा मिळून हा एक समाज, देश व संस्कृती कशी नाहीत हे सिद्ध करणारेच समाजकारण व राजकारण, दुर्दैवाने, अलीकडच्या काळात परिवर्तनवाद्यांकडून प्रकर्ष पावत गेले.

दबल्यासारखा झालेला रोग, कॅन्सर शरीरभर पसरावा तसा, आज फैलावला आहे. आपण रोगाचा प्रादुर्भाव शरीरभर करण्याचे श्रेय (वा अपश्रेय) संघपरिवाराला देऊ नये. त्यांचा अपराध त्याहून मोठा आहे. त्यांचा अपराध रोग्याच्या रोगग्रस्त अवस्थेत भर घालून सत्तेचे राजकारण करण्याचा व या राजकारणासाठी प्रभू रामचंद्रांना वेठीला धरण्याचा आहे. ही विनाशकाले विपरीत बुद्धी आहे.

मलमपट्टीने काम होण्यासारखे नाही ही गोष्ट खरीच. समाजाला अधिष्ठान, तेही खोलवर पोचणारे व मजबूत प्राप्त करून द्यावे ही निकड आहे. चक्रावून टाकणाऱ्या विविधतेला, ताणतणावांना, कलहांना, आकांक्षांच्या विस्फोटाला विधायक वृत्तीने सामोरे जात भारताचे एकराष्ट्रीयत्व व्यवहारात साकार करावयाचे आहे. तेच भारतीय समाजाला भक्कम अधिष्ठान प्राप्त करून देईल.

सर्वांसाठी सार्विक सत्य (ज्यामध्ये न्याय स्वातंत्र्य व समता ही मूल्ये अंतर्भूत आहेत) असे काही ज्ञान असतेच असते; आणि माणसे निरहंकारी, निस्वार्थी असतात व इतरांविषयी आत्मौपम्य वृत्ती बाळगतात तेव्हा त्यांना, सहाध्यायाने व सहकार्याने मिळून ते ज्ञान प्राप्त करता येते, आणि त्यासाठी सौहार्दपूर्ण संवाद हाच मार्ग असतो, ही मनोमन खात्री असावी लागते.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

महात्मा गांधींवर डिटमार रॉदरमुंड (Dietmar Rothermund) यांचे एक छोटेखानी इंग्रजी पुस्तक आहे. *Mahatma Gandhi : An Essay in Political Biography* या नावाचे. यामध्ये त्यांनी गांधींच्या सत्यविषयक दृष्टीची मूलग्राही व मार्मिक चिकित्सा केली आहे. ते लिहितात, "The quest for truth was central to Gandhi's life, but this was not the kind of truth which can be ascertained by verification according to the methods of critical scholarship. For him verification depended on deliberate action controlled by a vow. He stated that Truth is the Essence of the Vow and thus reflected the ancient Indian practice of 'satyakriya'..." 'सत्यक्रिया'ची स्पष्टता रॉदरमुंड अशी करतात : "Satyakriya means 'to make something true' and in the ancient texts it usually refers to a kind of ordeal whereby the person concerned takes an oath based on a secret truth, known only to himself, 'the person concerned acting upon it so as to be judged by God.' "

सत्य काय ही केवळ तटस्थ निरीक्षणाद्वारे आपणांस कळणारी गोष्ट नाही. वैज्ञानिक, वस्तुनिष्ठ या शब्दांचा आपण वापर करतो तेव्हा तथ्य, घटित, नियम अशा स्वरूपात सत्य हाती येण्याची गोष्ट आपण करीत असतो. पण जेथे 'सत्या'ला नैतिकतेचे, शिवत्वाचे, मांगल्याचे परिमाण प्राप्त असते तेथे गोष्टी वा संबंध वा वर्तन वा उक्ती इत्यादींच्या संबंधात 'कसे असायला हवे' 'कसे असणे अधिक खोलवर अर्थाने सत्य आहे' हा पदर त्याला असतो. शेजाऱ्यांमध्ये हेवेदावे, भांडणे, अगदी कोर्टकचेरीपण आढळते. तथ्याच्या पातळीवर वास्तव आपण स्वीकारतो; पण त्याच वेळी 'हे काही खरे नाही; शेजारधर्माने वागणे हेच खरे' असे म्हणतो.

इतिहासाचा धांडोळा घेऊन आपल्याला हे 'सत्य' गवसत नाही. इतिहास ही गोष्ट अशी आहे की, पुष्कळदा, तो जसा शोधावा, समजून घ्यावा तसा दिसतो, समजतो. कारण आपण अनेकानेक घटना, उक्ती-कृती यांच्यामधून एक आकृतिबंध शोधत, बघू पाहात असतो, आणि त्यासाठी काही वेचक गोष्टींवर ध्यान देतो, इतर हकीकती वगळतो. दृष्टी, आवाका, वकूब, हेतू, उद्देश, साध्ये, ग्रह-पूर्वग्रह या सगळ्यांमधून इतिहासकाराने निर्माण केलेला 'इतिहास' आकारास येत असतो. गांधींनी जेव्हा म्हटले की, 'Truth transcends histroy' तेव्हा त्यांचे म्हणणे अर्थपूर्ण होते.

गोध्रा स्टेशनवर काय घडले, गुजरातेत काय घडले व घडत आहे या विषयी 'शोध पत्रकारिते'च्या भूमिकेमधून वा इतिहासकाराच्या भूमिकेमधून पुष्कळ तपशिलात खोलवर आपण गेलो तरी, एका मर्यादेनंतर, वर्तमानाचा क्षण 'पकडण्या'च्या दृष्टीने त्याची उपयुक्तता सीमितच राहते. ज्यांचे नुकसान झाले त्यांना भरपाई द्यावी, अपराध्यांना शासन केले जावे, मुखमंत्र्यांनी (व केंद्रीय गृहमंत्री) यांनी राजीनामा द्यावा वगैरे मागण्या त्यांच्या त्यांच्या जागी ठीकही आहेत. पण अशा उपायांनी हिंदू-मुस्लिम ऐक्य अस्तित्वात येणार नाही. एका पातळीवर न्याय, 'कायद्याचे राज्य', 'राज्यकर्त्यांकडून त्यांच्या कर्तव्याचे पालन' यांसारख्या गोष्टी साध्य होतील, आणि त्याचेही महत्त्व आहे, नाही असे नाही. पण मुख्य गोष्ट ती नाही.

पूर्वीच्या काळी स्वतःचे म्हणणे खरे आहे हे सर्वांना दाखवून देण्यासाठी व्यक्तीला पंचांच्या साक्षीने दिव्य करावयास सांगितले जाई. छळ, दडपणूक, कपट-कारस्थान, हिंसाचार, बळ यासारख्या साधन-मार्गांनी दुसऱ्या व्यक्ती चा समूह यांना आपले म्हणणे मान्य करावयास लावणे ही 'सत्यक्रिया' मानली जात नाही; सत्तेच्या जोरावर बळजबरीने जे साध्य केले जाते, किंवा पैशाच्या जोरावर जे विकत घेतले जाते ते सत्य ठरत नाही, ही ध्यानात घेण्याची गोष्ट आहे. सत्य ही नैतिक-आध्यात्मिक गोष्ट आहे ही पायाभूत मान्यता आहे असा याचा अर्थ.

दिव्य करावयाचे याचाही अर्थ जाणून घेण्यासारखा आहे. ज्या पंचांच्या साक्षीने दिव्य करावयाचे असते त्यांची धारणा अशी असते की, सत्य-असत्याचा निवाडा ईश्वर करणार असतो. ईश्वर म्हणजे अशी शक्ती की जी निरहंकारी, निर्विकार, निर्मम, भेदाभेद न करीत सर्वांविषयी समत्वबुद्धी व सद्भाव बाळगणारी व म्हणून न्यायी असते. दिव्य करणाऱ्या व्यक्तीने 'सत्य-असत्यासी मन केले ग्वाही' या मनोभूमिकेमधून आत्मक्लेशाची स्वेच्छा तयारी दाखवायची असते. क्लेश अर्थातच आत्म्याला होत नाहीत, ते वासनाविकारयुक्त देहाला होतात. 'मी खरे तेच म्हणत असेन तर दिव्याची कसोटी

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

सुखरूपपणे पार पाडीन ही खात्री आहे, कारण ईश्वर न्यायी आहे' अशी त्या व्यक्तीची भूमिका असते.

या देशात राहणाऱ्या व या देशाचे असणाऱ्या सर्व विभिन्न व्यक्ती व समूह, जाति-जमाती, धार्मिक समुदाय यांचे अंतःकरणापासून ऐक्य हे आजच्या घडीला वास्तव तथ्य नाही. आपापसातील अलगाववृत्ती, फाटाफूट, कलह, हेवेदावे, परस्परांविषयी तिटकारा व घृणा — या व अशा अनेक अनुभवाच्या गोष्टी आहेत. या समाजाला स्वतःचे असे खोलवरून, आतून येणारे एकराष्ट्रीयत्वाचे अधिष्ठान आहेच आहे, कारण तेच सत्य आहे, अशी ज्यांची प्रतिज्ञा (vow) आहे त्यांना वर्तमानात सत्यक्रिया करावयाची आहे. Satyakriya means to make something true. कल्पनेच्या, ध्येयाच्या, उद्दिष्टाच्या अमूर्त व मानसिक पातळीवर नव्हे तर 'याचि देही याचि डोळां', लौकिक व्यवहारात. आपण अशा एका टोकाला येऊन पोचलो आहोत की ज्यांचे हे सत्याचे दर्शन असेल त्यांना मोठे दिव्य दीर्घकाळ करायला हवे आहे.

सत्यक्रियेचे आपल्या डोळ्यांसमोरील नमुनेदार उदाहरण महात्मा गांधींचे आहे. एका पातळीवर, हिंदू-मुस्लिम ऐक्य हे केवळ स्वप्नरंजन ठरले होते; आणि देशाची केवळ फाळणीच केली गेली नव्हती तर उत्तर भारतात या दोन जमातींमध्ये 'माणुसकीचा मुडदा पडला' म्हणावेसे वाटण्याइतका व त्या रंगरूपाचा हिंसाचार माजला होता. हा देश, व या देशातले लोक एकाच भूमीचे व संस्कृतीचे वारसदार आहेतच आहेत; जे आपल्या डोळ्यांदेखत घडतंय ते वास्तव आहे पण ते असत्य आहे, याविषयी गांधी निःशंक होते. लौकिक जीवनात ते सत्य मूर्त करण्याची त्यांची प्रतिज्ञा होती. कलकत्ता-नोआखाली-बिहार-दिल्ली या सगळ्या ठिकाणी ते दिव्य पार पाडीत होते. त्यातच ब्रह्मचर्याच्या बाबतीत स्वतःचे उणेपण तपासून पाहण्याचे दिव्यही आपण समाविष्ट केले पाहिजे.

भीषण दंगलीच्या ऐन मध्ये जीव धोक्यात घालून दंगलखोरांना रोखण्याचे काम पं. नेहरूंनी पहिले हंगामी पंतप्रधान झाल्याझाल्या केल्याचे, संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाच्या ओघात मुंबईत उसळलेल्या दंगलीच्या वेळी एसेमनी इन्स्पेक्टरचे प्राण वाचविल्याचे आपणांस माहीत आहे. असे अनेकानेक अनामिक वीर स्त्री-पुरुष होऊन गेल्याचेही आपणांस माहीत आहे. गांधी पार पाडीत असलेले दिव्य हे नव्हते. पीडित-दुःखितांची कीव न करता सन्मानपूर्वक त्यांच्याशी तसेच त्यांना पीडा व दुःख देणाऱ्यांशीही संवाद करणे हे दिव्य ते पार पाडीत होते. कलकत्त्याची कत्तल व नोआखालीतले हत्याकांड ज्यांनी संघटित व प्रोत्साहित केले त्या सुऱ्हावर्दीशी, जे घडले त्यावर पांघरूण न घालता, संवाद करीत शांती प्रस्थापनेच्या, मने निर्वैर व निर्भय बनविण्याच्या कृतीत त्यांना साथी करून घेणे हे दिव्य होते.

गांधींचा खून झाला आणि त्या धक्क्याने परिस्थिती निवळली. नंतरच्या वर्षांमध्ये दंगली होत राहिल्या, पण स्थानिक तात्कालिक बिघाडाचा परिणाम असे त्यांचे स्वरूप राहिले. पण अहमदाबाद, भिवंडीपासून, म्हणजे साधारणपणे १९७० च्या आसपास दंगलीसाठी निमित्तही शोधले वा निर्माण केले जाऊ लागले आणि मुसलमानांना धडा शिकविणे, मुसलमानांना इथे राहणे अवघड करून सोडणे, राष्ट्रद्रोही म्हणून त्यांच्याविरुद्ध द्वेष वाढविणे या गोष्टी वाढल्या. जयप्रकाशजींच्या पुढाकाराने आणीबाणीनंतर स्थापन झालेल्या जनता पक्षाचे विघटन झाल्यावर हिंदुत्वाच्या भूमिकेवर भारतीय जनता पार्टी नव्याने उभी करायच्या प्रयत्नात, पाकिस्तान व भारतीय मुसलमान यांना लक्ष्य बनवून आक्रमक, द्वेष्टे राजकारण करणाऱ्यांचा प्रभाव वाढत गेला. याच काळात संघाने या कामासाठी 'संघपरिवार'नामक आघाडी कुशलतेने संघटित केली. श्री. बाळ ठाकरे यांनी वारे फिरल्याचे हेरून शिवसेनारूपी वाघाच्या डरकाळ्यांचे मुस्लिमांना लक्ष्य केले, न.चिं. केळकर यांना मिळालेल्या 'साहित्यसम्राट' या पदवी-सारखी 'हिंदुहृदयसम्राट' ही पदवी त्यांना प्राप्त झाली, तोही हाच काळ.

दुसऱ्या बाजूला, मुसलमानांच्या मतांसाठीचे राजकारण तेवढे होत राहिले, आणि ते ऐक्य निर्माण करण्यासाठी पुरेसे मानले गेले. त्यांचा राजकारणातील सहभाग, व त्यांच्यापैकी अनेकांच्या उच्चतम पदांवर निवडी वा नेमणुका हे त्याचे प्रभावी गमक मानले गेले. चुचकारणे, पडते घेणे, सवलत देणे म्हणजेच संवाद असे समीकरण घातले गेले. गांधींनी १९४६-४८ या काळात जो संवाद सुरू केला तो बंद पडला, त्याची गरज जवळपास उरलेलीच नाही, असे वर्तन आपले घडत राहिले आहे.

दंगलीनंतर मदतीला, सांत्वनाला धावून जाणे, दंगलीचा निषेध करणे आणि दंगल वेळीच शमेल एवढी ताकद ऐनवेळी

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

उभी असणे यांत गुणात्मक अंतर आहे. प्रशासन गठित करते त्या शांतता कमिट्यांची टीका-टिप्पणी आपण करीत आलो. पण आपणही दंगलीची धग कमी होईतोवरच काम करतो. तसे तर कोणी काही केले वा केले नाही तरी जनजीवन सुरळीतपणे चालू होतेच.

संवाद म्हणजे परिषदा, परिसंवाद व लेख/पुस्तिका आयोजित/प्रकाशित करणेही नव्हे.

ज्यांच्या मनोधारणा, ज्यांचे वर्तन ऐक्यसंवर्धनाच्या आड येणारे आहे, ज्यांचे विचार वेगळे आहेत, जे विरोधक आहेत त्यांच्याशी सातत्याने चालणारा संवाद येथे अभिप्रेत आहे. गांधींचा खून झाला नसता तर त्यांनी संवादाची ही प्रक्रिया चालविली असती असे दिसते. नोआखालीतले त्यांचे काही सहकारी नंतरची अनेक वर्षे त्यावेळच्या पूर्व पाकिस्तानात असे कार्य करीत होते.

दीर्घकाळ व सातत्याने सत्यक्रियेचे दिव्य करण्याची निकड व तातडी स्पष्ट आहे.

●●

प्रा. मे.पुं. रेगे यांचे तत्त्वज्ञान

प्रा. रेगे यांच्या तत्त्वज्ञानात्मक लिखाणाचे टीकात्मक परीक्षण करणाऱ्या लेखांचा संग्रह

संपादक : डॉ. सुनीती देव
तत्त्वज्ञान-विभाग-प्रमुख, नागपूर विद्यापीठ, नागपूर

प्रा. दि.य. देशपांडे, डॉ. शि.स. अंतरकर, डॉ. ल.ग. चिंचोळकर, प्रा. प्र.ब. कुलकर्णी, डॉ. बा.य. देशपांडे, डॉ. सुनीती नी. देव, डॉ. सौ. उषा गडकरी, डॉ विवेक गोखले यांनी प्रा. रेग्यांच्या तत्त्वज्ञानात्मक लेखनाची केलेली समीक्षा आणि या समीक्षेवर प्रा. रेगे यांची टिप्पणी

'तत्त्वज्ञानातील माझी वाटचाल' हा प्रा. मे.पुं. रेगे यांचा या ग्रंथासाठी लिहिलेला विशेष लेख
प्रा. रा.भा. पाटणकर यांनी प्रा. रेगे यांच्या व्यक्तिमत्त्वाची करून दिलेली मर्मग्राही ओळख.

प्रा. रेगे यांच्या प्रकाशित मराठी व इंग्रजी साहित्याची संपूर्ण सूचीसह

प्रकाशन : डिसेंबर २००० **पृष्ठे : डेमी, २५३**
किंमत : रु. २२५/-

प्रकाशक
डॉ. सुनीती देव
३/४, कर्मयोग अपार्टमेंट,
सुशीला बलराज मार्ग,
धन्तोली, नागपूर ४४० ०१२

वितरक
राजहंस प्रकाशन,
१०२५ सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

अनुक्रमणिका